# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १० जुलै, २०२४ / आषाढ १९, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(२)** | **उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **अल्पसंख्यांक विकास, औकाफ, पणन मंत्री** | |
| **(६)** | **शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |
| **(७)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३५**

---

### परभणी-गंगाखेड महामार्गाची झालेली दुरवस्था

**(१) * ८१७७१ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी-गंगाखेड महामार्गासाठी कोट्यावधी रुपये खर्च करुन तयार करण्यात आलेल्या महामार्गाला जागोजागी भेगा पडल्याचे माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर भेगा पडल्याने अपघाताचे प्रमाण वाढले असून वर्षभरातच तो महामार्ग वाहतुकीसाठी धोकादायक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर महामार्गाची दुरुस्ती करणेबाबत तसेच संबंधित दोषी कंत्राटदार व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.

परभणी गंगाखेड राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ के. रस्त्याची एकूण लांबी ३५.८८५ किमी (साखळी क्रमांक किमी ०/० ते किमी ३५/८८५) असून त्याचे पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरण करण्याचे रु.२३७.८८ कोटी रक्कमेच्या कामास माहे मार्च ,२०१८ मध्ये रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांचेकडून मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश माहे जून,२०१८ मध्ये कंत्राटदारास देण्यात आले. सदर काम माहे जानेवारी,२०२२ सुमारास अंतिम टप्प्यात असताना किमी ०/०० ते किमी ४/००, किमी ६/०० ते किमी १०/००, व किमी २६/०० ते ३०/०० या लांबीमध्ये काही PQC पॅनेल्समध्ये भेगा पडल्याचे निदर्शनास आले होते.

(२) हे खरे नाही.

पोलिस विभागाच्या अहवालानुसार रस्त्यावरील भेगांमुळे कुठल्याही प्रकारचा अपघात घडल्याचे दिसून आले नाही.

(३) सदर रस्त्यावर पडलेल्या भेगांबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व MoRTH यांचेमार्फत नेमलेल्या एकूण २ तांत्रिक सल्लागारांकडून Third Party ऑडिट करण्यात आले. सदर ऑडिट अहवालानुसार सन २०२० व २०२१ मधील पावसाळयात झालेल्या अतिवृष्टीमुळे व पाण्याचा निचरा न झाल्यामुळे ओवर फ्लडींग होऊन रस्त्याच्या सबग्रेड

मध्ये पाण्याचा अंश वाढल्यामुळे काही ठिकाणी काँक्रीट PQC पॅनेल्स मध्ये भेगा पडल्याचे निदर्शनास आले. सदर पॅनेल्सची दुरुस्ती माहे जुलै,२०२३ मध्ये कंत्राटदाराने आय.आर.सी. मानकानुसार स्वखर्चाने पूर्ण केलेली आहे. तसेच पाण्याचा जलद गतीने निचरा होण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूस कच्ची गटारे व गोदावरी नदीच्या दोन्ही बाजूस काँक्रीट ड्रेन बांधण्यात आली आहेत. कंत्राटदाराने केलेल्या PQC पॅनेल्स दुरुस्तीकामाची IIT रुरकी व सेवानिवृत्त मुख्य अभियंता यांच्या टीममार्फत तपासणी करण्यात आली असून त्यांच्या अहवालानुसार दुरुस्तीचे काम आय. आर.सी. मानकानुसार योग्यप्रकारे झाले आहे. सद्य:स्थितीत सदर रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये होत असलेला गैरव्यवहार

**(२) * ७९९८७ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारने गरीब जनतेसाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना सुरु केली असून त्याचा लाभ शासकीय व निमशासकीय सेवेतील लाखो कुटुंब घेत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी जळगाव जिल्ह्यातील हजारो शासकीय अधिकारी व कर्मचारी या योजनेचा लाभ घेत असून यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ घेत असलेल्या शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्या शिधापत्रिका योग्य योजनेत वर्ग करणे आवश्यक असताना त्यासंदर्भात शासनस्तरावरुन कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे, वित्त विभागाकडील सेवार्थ प्रणालीवरील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची माहिती विभागाच्या शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीवरील डाटाबेस सोबत तपासण्यात आली असता राज्यातील १,००,२६२ एवढे शासकीय अधिकारी/कर्मचारी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा लाभ घेत असल्याचे दिसून आले.
(२) अंशत: खरे आहे, जळगाव जिल्हयातील ३,१२३ एवढे शासकीय अधिकारी/कर्मचारी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा लाभ घेत असल्याचे निदर्शनास आले.
(३) व (४) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा लाभ घेत असलेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या शिधापत्रिका योग्य योजनेत वर्ग करण्याच्या सूचना सर्व क्षेत्रीय कार्यालयांना दि.०९.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगाव (जि.नाशिक) येथे होत असलेली अंमली पदार्थांची विक्री व खाद्यपदार्थांतील भेसळ रोखण्याबाबत

**(३) * ८०८३५ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) येथे अंमली पदार्थ, कुत्ता गोळी, गुटखा ,ड्रग, भेसळयुक्त मसाला, भुसामिश्रित मिरची पावडर तसेच बनावट हळद, इ.खादयपदार्थ तसेच दुधात भेसळ करण्याचे प्रकार सर्रासपणे सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंमली पदार्थांची विक्री व भेसळ रोखण्याकरिता अन्न व औषध प्रशासन कार्यालय सुरु करावे याबाबत सार्वजनिक नागरी सुविधा समितीने अपर जिल्हाधिकारी, मालेगाव यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे

आहे काय,
(३) असल्यास, अशाप्रकारची भेसळ रोखण्याकडे शासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष होत असल्यामुळे अशा प्रकरणांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) हे अंशत: खरे आहे.
अशी बाब माहे, एप्रिल, २०२४ मध्ये अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही. तथापि, मालेगाव शहरात अंमली पदार्थ व कुत्ता गोळी यांची बेकायदेशीररित्या विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्याने पोलीस प्रशासनाने माहे मार्च, एप्रिल व मे २०२४ मध्ये एकूण ०६ गुन्हे दाखल केले आहेत.
(२) हे खरे आहे.
अध्यक्ष, सार्वजनिक नागरी सुविधा समिती व इतर यांनी "सणउत्सवाचे काळात मालेगाव शहरात अन्न व औषध प्रशासनाचे फिरते पथक नेमणेबाबत व मालेगाव शहरात अन्न व औषध प्रशासनाचे कार्यालय सुरु करून ड्रग इन्स्पेक्टरची नेमणूक करणेबाबत" या विषयाबाबतचे निवेदन अपर जिल्हाधिकारी, मालेगाव, जि. नाशिक यांना दिनांक ०८.०४.२०२४ रोजी दिले आहे. सदर निवेदन जिल्हाधिकारी, नाशिक (गृह शाखा) यांना दिनांक ०९.०४.२०२४ रोजी पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले असून सदर निवेदनावर नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
अन्न पदार्थातील भेसळीला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यभरात उत्पादक, वितरक, किरकोळ विक्रेते रस्त्यावर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापना यांचे नियमित तपासण्या करून नमुने घेण्याची कार्यवाही निरंतर केली जाते. अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील तरतुदीचे उल्लंघन आढळून आल्यास कायद्यातील तरतुदीनुसार नियमानुसार योग्य ती उचित कार्यवाही करण्यात येते.
(४) मालेगांव शहरात अंमली पदार्थ व कुत्ता गोळी यांची बेकायदेशीररित्या विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्याने पोलीस प्रशासनाने माहे मार्च, एप्रिल व मे, २०२४ मध्ये एकूण ०६ गुन्हे दाखल करून १३ आरोपींना अटक केली आहे. तसेच एकूण रु. ६२,६२९/- इतक्या किंमतीचा माल जप्त केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रांजणगांव (जि. छत्रपती संभाजीनगर) येथील गुरुकुल महाविद्यालयात प्रश्नपत्रिकांमध्ये गैरप्रकार होत असल्याबाबत

**(४) * ७९६९२ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रांजणगांव (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील गुरुकुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या स्ट्राँगरुममधून परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका संस्थाचालकांच्या मोबाईलवर पाठविण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आमदाबाद (ता.कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील पद्मावती कला महाविद्यालयात देखील असे गैरप्रकार सुरु असल्याचे परीक्षा विभागाच्या गोपनीय पथकाने निदर्शनास आणले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणांची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) होय हे खरे आहे,

(३) या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन विद्यापीठांच्या तांत्रिक समितीच्या सदस्यांनी महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेट देऊन तांत्रिक बाबींचा अहवाल सादर केला, सदर प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४८ (५) (क) च्या तरतूदीनुसार विद्यापीठाकडून समिती गठीत करण्यात आली. सदर समितीच्या अहवालातील शिफारशी परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या दिनांक १५ एप्रिल, २०२४ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आल्या. सदर बैठकीमध्ये या दोन्ही महाविद्यालयांना पुढील ०३ वर्षांपर्यंत कोणत्याही परीक्षेसाठी परीक्षा केंद्र देण्यात येऊ नये, तसेच, या महाविद्यालयांतील प्राचार्य व प्राध्यापकांना पुढील पाच वर्षांकरीता परीक्षेच्या कामापासून प्रतिबंधित करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला आहे.

दिनांक ०८.०४.२०२४ व दिनांक १०.०४.२०२४ रोजी घेण्यात आलेल्या बी.एससी (संगणकशास्त्र), बी.एससी (आय.टी.) व बी.सी.ए (सायन्स) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा रद्द करून दिनांक ३०.०४.२०२४ व दिनांक ०२.०५.२०२४ रोजी पुन्हा घेण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे इंदवटी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील शाळेच्या नवीन इमारत बांधकामाबाबत

**(५) * ८१७४० श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे इंदवटी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील शाळा क्र.२ जागे अभावी गेल्या दोन वर्षांपासून गुरांच्या गोठयात भरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेची इमारत अतिशय जीर्ण व धोकादायक स्थितीत असून एका वर्ग खोलीचे छप्पर खाली पडले असल्याने गुरांच्या गोठयातील पर्यायी जागेत शाळा भरवावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथे विद्यार्थ्यांसाठी पिण्याचे पाणी, बाथरुम तसेच स्वच्छतेचा अभाव इ. अनेक गैरसोयी आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शाळेच्या निर्लेखनाचे प्रस्ताव तीन वर्षांपुर्वीच शाळा प्रशासनाकडून पंचायत समिती, लांजा तसेच जिल्हा परिषद प्रशासन, रत्नागिरी यांच्याकडे पाठविण्यात येऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिनांक २० एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर शाळेच्या नवीन इमारत बांधकामाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) ते (४) सदर शाळेतील एका वर्गखोलीचे छप्पर कोसळले होते व शाळा इमारत जीर्ण झाली होती. त्यामुळे शाळा इमारत निर्लेखित करण्यात आली असून पर्यायी व्यवस्था म्हणून नजीकच्या शेतघरात शाळा भरविण्यात येत आहे. त्या ठिकाणी ग्रामस्थांच्या मदतीने पिण्याचे पाणी व शौचालयाची व्यवस्था केली आहे.

(५) जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत दोन नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी रू.२०,००,०००/- (वीस लक्ष) मंजूर करण्यात आले असून प्रशासकीय मान्यताही प्रदान करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### धुळे येथील जिल्हा परिषद कार्यालयात होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(६) * ८१७२१ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील जिल्हा परिषद कार्यालयात शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेळेवर थकीत वेतन न देणे, कर्मचाऱ्यांना मान्यतेपासून दहा वर्ष वंचित ठेवणे, मान्यतेसाठी चार ते पाच लाखांची मागणी करण्यात येत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित विभागांना तक्रार करूनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२) शिक्षण विभाग (प्राथमिक व माध्यमिक), जिल्हा परिषद, धुळे या कार्यालयास अशी तक्रार प्राप्त झालेली नाही.

तथापि धुळे जिल्ह्यातील खाजगी अनुदानित शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या थकित वेतनाबाबत शासन निर्णय दि.१५ जुलै, २०१७ अन्वये जिल्हा परिषद, धुळे या कार्यालयाने योग्य ती प्रशासकीय कार्यवाही केली असून, शिक्षण संचालनालयाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली व शालेय स्तरावरुन जिल्हा परिषद, धुळे कार्यालयाच्या लॉगिनवर ऑनलाईन प्राप्त झालेली थकित वेतन देयके पारित करण्यात येऊन संबंधितांच्या खात्यात सदर देयकांच्या रकमा वर्ग करण्यात आल्या आहेत.

जिल्हा परिषद, धुळे या कार्यालयामार्फत खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांतील कर्मचाऱ्यांच्या मान्यतेची कोणतीही प्रकरणे १० वर्षे एवढ्या दिर्घ कालावधी साठी प्रलंबित नाहीत. तसेच या संदर्भातील आर्थिक देवाणघेवाणीच्या बाबतीत कोणतीही तक्रार संबधित कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### औषध विक्रेत्यांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(७) * ७९४३६ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औषध विक्री दुकान परवानाधारकाने (फार्मासिस्ट) स्वत: चालविणे कायद्याने बंधनकारक असतानाही मुंबई, ठाण्यामध्ये सुमारे २०० तसेच पुणे जिल्ह्यात सुमारे ८००० दुकानांमध्ये परवानाधारक स्वत: उपस्थित नसणे तसेच अनेक ठिकाणी हे परवाने अन्य व्यक्तींना भाडेतत्वावर चालविण्यास देण्यात येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरप्रकारांकडे अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुकानदारांविरुध्द तसेच त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१), (२), (३), (४) हे खरे नाही.

औषधे व सौंदर्य प्रसाधने नियम, १९४५ च्या नियम ६४ नुसार किरकोळ औषध विक्री दुकानास परवाने मंजूर करण्यापूर्वी रजिस्टर्ड फार्मासिस्टची नेमणूक करण्याची अट आहे. त्यानुसार, औषध विक्री परवाने मंजूर करण्यापूर्वी दुकानांमध्ये रजिस्टर्ड फार्मासिस्ट असल्याबाबतची पडताळणी करूनच किरकोळ औषध विक्री परवाने मंजूर करण्यात येतात.

दि.०६.०१.२०२४ च्या 'दै. लोकसत्ता' वर्तमानपत्रात मुंबई, ठाण्यामध्ये २०० औषध दुकानात फार्मासिस्ट यांची अन्न व औषध प्रशासनाकडे नोंद नसल्याबाबत बातमी प्रसिद्ध झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाकडून मुंबई व ठाण्यात XLN ऑनलाईन प्रणालीमध्ये आढळून आलेल्या विना रजिस्टर्ड फार्मासिस्ट पेढयांची संबंधित क्षेत्रीय औषध निरीक्षकांमार्फत पडताळणी करण्यात आली. सदर पडताळणीमध्ये बहुतांश पेढया या बंद झाले असल्याचे निदर्शनास आले. तथापि, सदर परवानाधारकांनी त्यांचे परवाने ऑनलाईन प्रत्यार्पित केले नसल्यामुळे व काही पेढयांनी त्यांच्याकडील रजिस्टर्ड फार्मासिस्टची नोंद संगणकीय प्रणालीत केली नसल्यामुळे संगणकीय प्रणालीत सदर पेढया विना रजिस्टर्ड फार्मासिस्ट असल्याचे दिसून आले. उक्त प्रकरणी औषध निरीक्षकांनी सादर केल्यानुसार बंद झालेल्या पेढयांचे परवाने ऑनलाईन प्रणालीत रद्द करण्याची कारवाई करण्यात आली आहे. तसेच, रजिस्टर्ड फार्मासिस्टची संगणकीय प्रणालीत नोंद न घेतलेल्या पेढयांना रजिस्टर्ड फार्मासिस्टच्या नेमणुकीची नोंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच, पुणे जिल्हयामध्ये माहे एप्रिल,२०२३ ते मार्च, २०२४ या कालावधीत विनापरवाना औषधे साठा/विक्री केल्याची ०३ प्रकरणे निदर्शनास आली असून सुमारे ८७.०३/- लक्ष रुपये किंमतीचा माल जप्त करण्यात आला आहे. तसेच, सदर कालावधीत पुणे जिल्हयात तपासणीतील रजिस्टेड फार्मासिस्ट गैरहजर प्रकरणी २५ परवानाधारकांविरूद्ध परवाने निलंबनाची कारवाई करण्यात आली असून १८ परवानाधाराकांचे परवाने रद्द करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणघाट व समुद्रपुर (जि.वर्धा) तालुक्यातील रस्त्यांच्या प्रलंबित कामांबाबत

**(८) * ८३११८ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट व समुद्रपुर (जि.वर्धा) तालुक्यातील HAM NAG-१७५ अंतर्गत हिंगणघाट, नंदोरी, कोरा, चिमूर या रस्त्यांच्या कामासाठी रुपये १८० कोटी मंजूर होऊनही अद्यापही सदरहू रस्त्यांचे काम प्रलंबित असून संपूर्ण रस्ता खोदून ठेवण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खोदून ठेवलेल्या खराब रस्त्यांमुळे उक्त ठिकाणी ५ ते ६ नागरिकांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित कंत्राटदाराने या रस्त्यांची कामे अर्धवट सोडली असून अनेक कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सदरहू रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करणे, निकृष्ट कामाची दुरुस्ती करणेबाबत तसेच संबंधित कंत्राटदार व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सदर रस्त्याच्या ४८.६०५ किमी लांबीच्या कामा करिता रु.१५०.०० कोटीची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर रस्त्याचे काम सद्य:स्थितीत प्रगतीत आहे.

(२) रस्त्यावरील प्रगतीत असलेल्या कामामुळे जिवीतहानी झाल्याची नोंद नाही.

(३) हे खरे नाही. सदरचे काम करारनाम्यातील तरतूदीनुसार व विनिर्दिष्ट मानकानुसार प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील राईस मिल संघटनेला भरडाई प्रक्रियेचे दर वाढविणेसह धान्याचे होणारे नुकसान थांबविणेबाबत

**(९) * ८१८८३ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील राईस मिल संघटनेच्या बहिष्कारामुळे पणन महासंघ व आदिवासी विकास महामंडळाने खरेदी केलेले ६ लाख १२ हजार ८७७ क्विंटल धान विविध केंद्रांवर उघडयावर पडल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर राईस मिल मालकांना शासनाकडून भरडाईसाठी एका क्विंटलमागे केवळ १० रुपये दर दिला जात असून दर वाढवून देण्याबाबत शासनाकडे मागणी करुन देखील त्याची दखल घेतली जात नसल्याने भरडाई प्रक्रियेवर त्यांनी बहिष्कार घातला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भरडाईचे दर वाढविणे व धान्याचे होणारे नुकसान थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) अंशतः खरे आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात खरेदी करण्यात आलेल्या एकूण ७,०६,७३२.१ क्विंटल धानापैकी १,०८,५८५.११ क्विंटल इतक्या धानाची उघड्यावार साठवणूक करण्यात आली होती. तथापि, आता त्यापैकी ६०,८३५.५९ क्विंटल इतक्या धानाची भरडाईसाठी उचल करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) राईस मिलर्सनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने भरडाई दर वाढवून देण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर मांडण्याचे विभागाच्या विचाराधीन असून सद्य:स्थितीत सदर प्रस्ताव वित्त विभागास सादर केला आहे.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील कृषी उत्पन्न बाजारसमितीच्या सभापती व सचिवांनी गाळे हस्तांतरणामध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(१०) * ८३३६५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समिती, कल्याण (जि.ठाणे) येथील सचिव, सभापती व इतर संचालकांनी श्री.सदाशिवभाऊ कुऱ्हाडे आणि श्री.संदिप बन्सी वाळूंज यांचे नावे असलेले गाळे क्र.ए/बी/१६ आणि ए/ए/१८ तसेच अन्य चार (१५० चौ.फू.) असे एकूण ६ गाळे अर्जदारांच्या मागणीनुसार नावे हस्तांतरण न करता पदाचा दुरुपयोग व एपीएमसी कायद्याचे उल्लंघन करुन हस्तांतरणास मान्यता न देता लिलावाद्वारे परस्पर विक्री करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक ०१ मे, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात अर्जदारांनी पणन संचालक, पुणे यांचेकडे दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी तक्रार केली असता दिनांक १८ एप्रिल, २०१३ रोजी एकूण २९ वर्षांकरिता करण्यात आलेला भाडे करार अद्याप कायम असल्यामुळे सदरहू दोन्ही गाळयांचा ताबा अर्जदारास तात्काळ हस्तांतरीत करण्याचे आदेश दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास पणन संचालकांनी देऊनही अद्यापपर्यंत कल्याण एपीएमसी मार्केटचे सभापती व सचिवांनी गाळयाचा ताबा दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गाळेधारकांना तात्काळ ताबा देणेबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

श्री.कुऱ्हाडे व श्री.वाळुंज यांनी पणन संचालकांकडे दि.१८.०२.२०१६ रोजी अपिल दाखल केले होते. सदर अपिलावर सहसंचालक (पणन) यांनी दि.२५.०७.२०१६ च्या आदेशान्वये वादी यांना त्यांच्या गाळयांचा ताबा प्रतिवादी बाजार समितीने द्यावा असे आदेश पारित केले. सदर आदेशाविरुध्द बाजार समितीने उच्च न्यायालयात याचिका क्र. १२९६९/२०१६ व १२७५५/२०१६ दाखल केल्या आहेत. सदर दोन्ही याचिकेवर एकत्रित सुनावणी घेवून मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.०७.०३.२०१७ च्या आदेशान्वये रोजी सहसंचालक (पणन), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.२५.०७.२०१६ चे आदेशास स्थगिती दिलेली आहे.
(३) सदरची बाब न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण करणेबाबत**

**(११) * ७९५१५ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाळांमधील बोगस पटसंख्येला आळा घालण्यासाठी राज्यात पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची माहिती सरल आणि यू-डायस प्लस प्रणालीच्या माध्यमातून एकत्रिकरणासाठी विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण करण्याच्या सूचना शासनाने सर्व शाळांना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील २ कोटी १२ लाख ५५ हजार ३५ शालेय विद्यार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी असलेल्या आधार कार्ड वैधतेसाठी दिनांक ३० मार्च, २०२४ रोजीपर्यंत अंतिम मुदत देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असे असतानाही अद्यापही १० लाखाहून अधिक विद्यार्थ्यांची आधार कार्ड नोंदणी न होणे, काही ठिकाणी आधारकार्ड अवैध ठरणे, शाळेतील नोंदी आणि आधार कार्डावरील माहितीतील विसंगती इत्यादी अनेक कारणांमुळे या विद्यार्थ्यांच्या आधार प्रमाणिकरणाचे काम अपूर्ण असून याबाबतची माहिती शिक्षण विभागाकडे प्राप्त झाली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आधार नोंदणीअभावी विद्यार्थी संख्या अद्ययावत न झाल्यामुळे लाखो विद्यार्थी गणवेश, शिष्यवृत्ती व शालेय पोषण आहारासारख्या विविध योजनांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण तात्काळ करणेबाबत तसेच यात हलगर्जीपणा करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

राज्यातील शिक्षण घेत असलेल्या २,१२,२८,६७६ विद्यार्थ्यांच्या आधार पडताळणी अंती २,००,८६,६७१ विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक वैध ठरले आहेत. उर्वरित ११,४२,००५ विद्यार्थ्यांपैकी ३,३४,१८२ विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड उपलब्ध नसून ८,०७,८२५ विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाच्या माहितीमध्ये विसंगती असल्याने त्यामधील त्रुटी /तफावत दूर करुन आधार क्रमांक वैध करण्याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे. विद्यार्थ्यांची आधार क्रमांक पडताळणी न झाल्यामुळे गणवेश व अन्य योजनांपासून त्यांना वंचित ठेवण्यात येत नाही. विभागामार्फत प्रत्येक गट साधन केंद्रावर २ असे एकूण ८१६ आधार संच उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील खाजगी आयसीएसई, सीबीएसई व आयजी बोर्ड या केंद्रीय बोर्डांच्या शाळा शासन नियमांचे पालन करीत नसल्याबाबत**

**(१२) * ७९४९७ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय बोर्डाच्या शाळा व्यवस्थापन, पालकांकडून मोठ्या प्रमाणात जादा शुल्क आकारत असून शासनाच्या नियमांचे पालन करत नसल्याने अशा शाळांची चौकशी करुन कार्यवाहीचा अहवाल सादर करणेबाबत राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालकांना दिनांक १८ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ च्या अधिनियमानुसार आयसीएसई, सीबीएसई व आयजी बोर्डाच्या शाळांनी तसेच मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या ४१५ खाजगी विना अनुदानित प्राथमिक शाळांनी शालेय शिक्षण विभागाकडून शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांना मान्यता घेतली नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात पालक विद्यार्थी संघटनेकडून तक्रारी प्राप्त झाल्यानुसार यावर शिक्षण उपसंचालकांनी संबंधितांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात येत असून चौकशीनंतर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) येथील शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रांनी शेतकऱ्यांना मोबदला न दिल्याबाबत

**(१३) * ८२००४ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात आदिवासी विकास महामंडळाच्या उप प्रादेशिक विभागाअंतर्गत शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रांनी शेतकऱ्यांकडून धान खरेदी करुन ३ महिने होऊनही अद्याप त्याचा मोबदला दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यातील धान खरेदी केंद्रांनी पूर्वीची धान खरेदी-विक्रीची ऑफलाईन पद्धत बंद करुन ऑनलाईन सेवा सुरु केल्यामुळे येथील अशिक्षित शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

योजनेंतर्गत शेतक-यांना विनासायास लाभ मिळण्याकरिता केंद्र शासनाच्या सूचनांनुसार थेट लाभ हस्तांतरण सुरु केले आहे. त्याकरिता आवश्यक प्रक्रियेचा भाग म्हणून पीक पेरा पाहणी, आधार कार्ड लिंक, ओटीपी इत्यादींची आवश्यकता असते. दुर्गम भागातील कमकुवत नेटवर्क सुविधेमुळे या प्रक्रियेत तात्पुरत्या स्वरुपात अडथळे येण्याची शक्यता असते.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयात अवैधरित्या होत असलेल्या घरगुती गॅस, डिझेल व पेट्रोल चोरी प्रकारांवर आळा घालणेबाबत

**(१४) * ८३६८४ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील चाकण शिक्रापूर मार्गावरील शेल पिंपळगाव येथील मोहितेवाडी परिसरात कंटेनरमधून गॅस चोरी करताना झालेल्या भीषण स्फोटात आजुबाजुची घरे, ढाब्यांसह उभ्या असलेल्या वाहनांना आग लागल्याचे दिनांक १९ मे,२०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पिंपरी-चिंचवड येथील ताथवडे परिसरात टँकरमधून गॅस चोरी करताना नऊ टाक्यांचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत तीन स्कूल बसेस जळून खाक झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्ह्यात अवैधरित्या घरगुती गॅस, डिझेल, पेट्रोल चोरीच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत असून त्याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत करणे, अशा गैरप्रकारांना आळा घालणेबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, ही बाब खरी आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) मौजे मोहितेवाडी, ता. खेड, जि. पुणे येथे दि. १९.०५.२०२४ रोजी पहाटे ४.०५ वा. गट नं.२२१२/३ मध्ये झालेल्या घटनेबाबत पोलीस स्टेशन चाकण येथे गुन्हा क्र.०३४०/२०२४ दाखल करण्यात आला आहे.

मौजे ताथवडे येथील दुर्घटने प्रकरणी गॅस सिलेंडर स्फोटात जबाबदार असलेल्या इसंमाविरूध्द सरकार तर्फे वाकड पोलीस ठाणे येथे दि.०९.१०.२०२३ रोजी गु.र.नं. ९८०/२०२३ सदर गुन्ह्याची नोंद केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलाच्या कमानी खालील स्लॅबचा भाग कोसळल्याबाबत

**(१५) * ७९८४४ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील तलासरी चौकातील उड्डाणपुलाच्या कमानीखालील स्लॅबचा काही भाग अचानक कोसळल्याने वाहतूक ठप्प झाल्याचे माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलासरी उड्डाणपुलावर वाहतूक कोंडी झाल्याने गुजरातकडे जाणारी अवजड वाहने दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने मुंबईकडून जाणाऱ्या वाहिनीवर जात असल्याने दोन्ही वाहिनी मधील दुभाजक आणि प्लास्टरचा भाग तसेच उड्डाणपुलाच्या उत्तरेकडील भाग कोसळल्याने या पुलाला मोठा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन सदर पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन झालेल्या नुकसानीची भरपाई कंत्राटदाराकडून वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

सदर राष्ट्रीय महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत आहे. तलासरी उड्डाणपुलाच्या दोन्ही मार्गिकांचे डेक स्लॅब वेगवेगळे असून त्यामध्ये काही गॅप ठेवण्यात आला आहे. केवळ सुशोभिकरणाच्या हेतूने सदर गॅपवर ड्रेन कव्हर्स ठेवण्यात आले आहेत. वाहनाच्या धडकेने ड्रेन कव्हर्स काही प्रमाणामध्ये खराब झाल्याने दोन्ही डेक स्लॅबच्या गॅप मधून काही प्रमाणात माती खाली पडत असल्याचे निदर्शनास आले आहे. या घटनेमुळे कोणतीही वाहतूक कोंडी झाल्याचे दिसून आले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) ॲथोरीटी अभियंता यांनी उड्डाणपुलाची पहाणी केली असून उड्डाणपुलाच्या मुख्य भागाला कोणतेही नुकसान झालेले नसून दोन्ही मार्गिकेच्या डेक स्लॅब मधील गॅप मध्ये ठेवण्यात आलेल्या ड्रेन कव्हर्सचे तुरळक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात कांदा प्रक्रिया उद्योग सुरु करण्याबाबत**

**(१६) * ७९९०७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कांद्याचे उत्पादन मोठया प्रमाणावर होत असून देशाच्या एकूण कांदा उत्पादनात राज्याचा वाटा ५० टक्क्याहून जास्त असतांनाही राज्यात फक्त तीनच कांदा प्रक्रिया उद्योग सुरु असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गतवर्षी कांदा महाबँक तसेच कांदा प्रक्रिया उद्योग सुरु करण्याची घोषणा करुनही त्याची अद्यापही अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्यापेक्षा कमी कांदा उत्पादन असलेल्या अन्य राज्यात मोठ्या प्रमाणात प्रक्रिया प्रकल्प कार्यरत असताना महाराष्ट्रात मात्र हे प्रक्रिया प्रकल्प कमी असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून एकीकडे कांद्याचे निर्यात धोरण स्थिर नसताना पुरेशी प्रक्रिया केंद्रे देखील उपलब्ध नसल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात मोठ्या प्रमाणात कांदा प्रक्रिया उद्योग सुरु करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) सन २०२३-२४ मध्ये देशातील कांदा उत्पादनात राज्याचा वाटा ४९.६२ टक्के आहे. सध्या राज्यामध्ये एकुण ६ विक्रीकरण प्रक्रिया केंद्रे आहेत. त्यापैकी ३ विक्रीकरण केंद्रांवर कांदा प्रक्रिया करण्यात येते.

(२) व (३) राज्यातील समृध्दी महामार्गालगत नियोजित औद्योगिक नोडमध्ये ईरॅडिएशन या उच्च तंत्रज्ञानावर आधारित कांदा महाबँक, कांदा प्रक्रिया व साठवणूकीबाबत प्रकल्प उभारण्यासंदर्भात मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८/१२/२०२३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत निर्देश देण्यात आले आहे.

(४), (५) व (६) महाराष्ट्र राज्य निर्यात प्रोत्साहन धोरण २०२३ अंतर्गत निर्यातीभिमूख पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमातंर्गत कांदा प्रक्रियेवर आधारित प्रकल्प प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यासंदर्भात पुढील कार्यवाही उद्योग विभागामार्फत सुरु आहे.

-----------------

**धर्माबाद ( जि.नांदेड) येथे भेसळयुक्त खाद्यतेलांची विक्री रोखण्याबाबत**

**(१७) * ८२४६१ श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद ( जि.नांदेड) येथे बनावट, भेसळयुक्त खाद्यतेलाची सर्रासपणे विक्री होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भेसळयुक्त तेल विक्री रोखण्यासह यातील दोषींवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) व (२) धर्माबाद (जि. नांदेड) शहरात अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ०१.०४.२०२३ ते दिनांक १८.०६.२०२४ या कालावधीत एकूण तीन आस्थापनांमधून खाद्यतेलाचे एकूण ०३ नमुने विश्लेषणासाठी घेतले होते. त्यापैकी २ प्रकरणी १२८० कि. ग्रॅ. इतका खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला आहे. विश्लेषणासाठी घेण्यात आलेल्या एकूण ०३ अन्न नमुन्यांपैकी १ अन्न नमुना प्रमाणित असून २ अन्न नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झालेले नाहीत. सदर नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त होताच त्याअनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील तरतूदी व नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. तसेच, एका प्रकरणी खुले खाद्यतेल विक्रीच्या अनुषंगाने न्यायनिर्णय अर्ज दाखल करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण अधिकाऱ्यांमार्फत गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(१८) * ८३५४५ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :**
सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागातील माध्यमिक शिक्षण अधिकारी, श्रीमती ललिता दहितुले या आर.पी. मंगला हायस्कुल मधील रुपाली थोरात, लिपिक यांच्यामार्फत लाच घेऊन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध कामे करीत असून यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेअंतर्गत शाळा मान्यता, वेतनेतर अनुदान, शिक्षकांच्या बदल्या, निवृत्त शिक्षक कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन, कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके मंजुरी तसेच अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा अतिरिक्त कर्मचारी म्हणून समावेश करणे, फेरफार करणे व वरिष्ठ शिक्षकांना डावलून कनिष्ठ शिक्षकांचा समावेश करणे आदि नियमबाह्य कामे आर्थिक संगनमत करुन करण्यात येत असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणात लाचखोर अधिकाऱ्यांवर सक्तवसूली संचालनालया मार्फत चौकशी करण्याचे आश्वासन मा.उपमुख्यमंत्री यांनी देऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) खरे नाही.
(३) संबंधीत प्रकरणी सक्तवसुली संचालनालयामार्फत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले नाहीत.
(४) याप्रकरणी गठीत करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीने चौकशीअंती सादर केलेल्या प्राथमिक चौकशी अहवालात नमूद अभिप्रायानुसार सदर प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर सखोल चौकशी करण्यासाठी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना स्वस्त दरात धान्य पुरविणेबाबत**

**(१९) * ८१५३२ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत राज्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इत्यादी सणानिमित्त आनंदाचा शिधा वितरण करण्याचा शासन निर्णय दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) तथापि, राज्यात सर्व प्रकारच्या शिधापत्रिकाधारकांना सदर योजनेचा लाभ देण्यात येत नसल्याने सर्वसामान्य नागरिक व मध्यमवर्गीय नागरिक व इतर सर्व वर्गीय शिधापत्रिकाधारक नाराजी व्यक्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्व नागरिकांना रेशन कार्ड उपलब्ध करून देणे व या सर्व कार्डधारकांना स्वस्त दरात धान्य पुरविणे ही शासनाची मूळ संकल्पना असतानाही अनेक रेशन कार्डधारकांना धान्यच देण्यात येत नसल्याने लाखो कार्डधारक हे धान्याविना वंचित राहत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विभक्त व नवीन कार्डधारकांना धान्य पुरविण्यासाठी रेशनिंगच्या कोट्यात वाढ करून (इस्टांक) देण्याची आवश्यकता असतानाही ती न केल्याने अनेक रेशन कार्डधारकांना धान्यच मिळत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०११ च्या जनगणनेनुसार देण्यात येणाऱ्या रेशन कार्डच्या माहितीचा आढावा घेऊन चालू वर्षाच्या जनगणनेचा अभ्यास करण्यासाठी तसेच रेशनकार्ड धारकांच्या किमान उत्पन्नाच्या निकषात बदल करुन ८ लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्या सर्व नागरिकांना सवलतीच्या दरात धान्य आणि केंद्राकडून मिळणारे मोफत धान्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, "आनंदाचा शिधा" अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेतील पात्र शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा या १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्रय रेषेवरील शेतकरी शिधापत्रिकाधारकांना वितरित करण्यात येतो.

(३) हे खरे नाही.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील पात्र शिधापत्रिकाधारकांसाठी केंद्र शासनाने मंजूर केलेल्या नियतनाच्या मर्यादेत अन्नधान्याचे वितरण केले जाते.

(४) हे खरे नाही.

(५) शासन निर्णय दि.२९.०४.२०२४ अन्वये, राज्यातील प्राधान्य कुटुंब योजनेच्या ग्रामीण व शहरी लाभार्थ्यांसाठी सुधारित उत्पन्नाबाबतचे निकष तपासण्याकरीता नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वागळे इस्टेट (जि. ठाणे) येथे बनावट औषधांचा साठा तयार करण्यात आल्याबाबत

**(२०) * ८३४९१ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील शासकीय रुग्णालयातील औषध भांडार विभागात अन्न औषध प्रशासन विभागाने केलेल्या तपासणीत संसर्गजन्य आजारावर देण्यात येणाऱ्या औषध गोळया या बनावट असल्याचे माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वागळे इस्टेट (जि. ठाणे) येथे बनावट औषधांचा मोठ्या प्रमाणात साठा तयार करून त्याचा पुरवठा ठाणे जिल्ह्यातील विविध शासकीय रुग्णालयात करण्यात आल्याचेही नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आली नाही.

(३) जिल्हा मुख्य औषध भांडार, जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे येथून रिफॅन्ट फार्मा प्रा. लि., गुजरात, या कंपनीने तयार केलेल्या औषधाचा नमुना विश्लेषणासाठी घेण्यात आला होता. सदर नमुना शासकीय प्रयोगशाळा, मुंबई येथे तपासणीसाठी पाठविण्यात आला असता. औषधांचा नमुना बनावट असल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच, जिल्हा मुख्य औषध भांडार, जिल्हा सामान्य रुगणालय, ठाणे यांना अप्रत्यक्षरित्या औषध पुरवठा करणारी मे. के. पी एजन्सी, हरियाणा व औषधाचे उत्पादन करणारी मे. रिफॅन्ट फार्मा प्रा. लि. केरला, गुजरात अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे, या प्रकरणी संबधिताविरूद्ध वागळे इस्टेट पोलिस स्टेशन, ठाणे येथे प्रथम खबर अहवाल क्र. ०५८७/२०२४, दिनांक ०९.०५.२०२४ रोजी नोंदविण्यात आला असून औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतर्गत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यात आदिवासी शेतकऱ्यांकडून भात खरेदी बंद केल्याबाबत

**(२१) * ८२१०२ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळाकडे धान्य साठविण्यासाठी गोदाम उपलब्ध नसल्याने भात खरेदी बंद केल्याने आदिवासी शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भात केंद्रावर आतापर्यंत १३०० शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून त्यापैकी ८६५ शेतकऱ्यांचाच भात महामंडळाने खरेदी केला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर्षी शासनाने भाताला रुपये २१८३ प्रति क्विंटल इतका हमीभाव दिला असल्याने आदिवासी विकास महामंडळाने सदर भाताची खरेदी थांबविल्याने खाजगी व्यापारी आदिवासी शेतकऱ्यांकडून कमी दराने भात खरेदी करीत असल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

ठाणे जिल्ह्यात एकूण ११२८६ शेतक-यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६८४२ शेतक-यांनी धान विक्रीसाठी खरेदी केंद्रावर आणले तर उर्वरित शेतक-यांनी खरेदी केंद्रावर धान विक्रीसाठी आणले नाही.

(३) खाजगी व्यापारी आदिवासी शेतकऱ्यांकडून कमी दराने भात खरेदी करीत असल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोरठण (ता.जव्हार, जि.पालघर) येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२२) * ७९६७६ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरठण (ता.जव्हार, जि.पालघर) येथील जिल्हा परिषद प्रशासनाअंतर्गत निवासी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास १६ विद्यार्थीनींना विषबाधा होऊन ताप, उलट्या व जुलाब होऊन त्या अत्यावस्थ झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यालयात विद्यार्थिनींना निकृष्ट दर्जाचे जेवण देण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विद्यालयातील जवळजवळ १५० आदिवासी मुली शिक्षण घेत असून विद्यार्थीनींना विहिरीतून दूषित पाणी पुरवठा होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी पालंकाकडून तक्रारी करण्यात आल्या असून शासनाने याची कोणतीही दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करणेबाबत तसेच विद्यार्थीनींना आवश्यक सोयी-सुविधा व स्वच्छ पाणी पुरवठा होणेकरिता कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) गोरठण (ता. जव्हार) या ठिकाणी निवासी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील विद्यार्थींनीना दूषित पाण्यामुळे ताप, उलट्या व जुलाब झाल्यानंतर दि.२८.०२.२०२४ रोजी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

पाणी नमुने तपासणी अहवालानुसार ६ पैकी ३ पाण्याचे नमुने पिण्यास अयोग्य आढळून आले असून शाळेतील विद्यार्थीनी व परिसरातील जनता यांना शुध्द पाण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. या संदर्भात पालकांकडून कोणत्याही प्रकारची लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात विशेषत: मौ.सिरसम (पालम) तांदूळवाडी, पोरवणी (देवी) हटकरवाडी, कांगणेवाडी (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथे मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत पुरेसा पोषण आहार देणेबाबत**

**(२३) * ८०१२४ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व अनुदानित शाळांमधील पहिली ते आठवी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना पोषण आहारामध्ये अंडी आणि केळीचा लाभ देण्याचे स्पष्ट निर्देश प्राथमिक संचालनालयाने दिले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौ.सिरसम (पालम) तांदूळवाडी, पोरवणी(देवी) हटकरवाडी, कांगणेवाडी (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथे मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत पुरेसा पोषण आहार मिळत नसून त्यात अंडी, चिक्की, भाज्या व फळे इत्यादींचा समावेश नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अमरावती जिल्हयातील वरुड व मोर्शी येथे मोठया प्रमाणात संत्रा फळ उपलब्ध असतांनाही त्याचा पुरक आहारामध्ये समावेश अद्यापपर्यंत करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मध्यान्ह भोजन योजने मध्ये देण्यात येणाऱ्या पोषण आहाराची गुणवत्ता दर्जेदार नसल्यामुळे विद्यार्थी आहार घेणे नापसंत करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नियमित दुपारच्या जेवणा व्यतिरिक्त अंडी, दूध, फळे व चिक्की असा पोषण आहार पुरविणाऱ्या तामिळनाडूसारख्या इतर राज्याच्या तुलनेत राज्यातील पोषण आहाराच्या अंमलबजाणीत मोठी तफावत दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या योजनेंतर्गत केवळ शासकीय व अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्यात आला असून राज्यातील मान्यताप्राप्त विनाअनुदानित शाळांमध्ये मात्र हा आहार देण्यात न आल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये दुजाभावाची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

कांगणेवाडी, (ता. गंगाखेड, जि. परभणी ) सदर शाळा शून्य पटसंख्या झाल्यामुळे सन २०१८ पासून बंद करण्यात आली आहे.

तसेच, मौ. सिरसम (पालम) तांदूळवाडी, पोरवणी (देवी) हटकरवाडी या शाळांतील विद्यार्थ्यांना नियमित पोषण आहारासोबत पुरक पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो.

(३) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत राज्यातील योजनेस पात्र असलेल्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना आठवड्यातून एक दिवस अंडी तसेच, जे विद्यार्थी अंडी खात नाहीत अशा विद्यार्थ्यांना केळी अथवा स्थानिक उपलब्ध फळाच्या स्वरुपात लाभ देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

राज्यातील प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना नियमित आहारासोबत आठवड्यातून एक दिवस अंडी / केळी / स्थानिक फळे इ. लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, राज्यातील आकांक्षित व विशेष लक्ष जिल्हे आणि पेसा अंतर्गत तालुके यामधील विद्यार्थ्यांना मिलेट न्युट्रिटिव्ह बारचा लाभ देण्यात आला आहे.

(६) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर योजनेचा लाभ राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील इ.१ ली ते इ.८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना देण्यात येतो.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील गोखले इन्स्टिट्युटचे कुलगुरु यांनी ज्युनो सॉफ्टवेअर कंपनीमार्फत गुणपत्रिकांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(२४) * ८०३९९ श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील गोखले इन्स्टिट्युटचे कुलगुरु डॉ.अजित रानडे यांनी व्यवस्थापन मंडळ ते विदयापीठ अनुदान आयोग यांच्याशी संगनमत करुन ज्युनो सॉफ्टवेअर या कंपनीमार्फत विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांचा गैरव्यवहार केल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुणपत्रिकांच्या गैरव्यवहारामुळे विद्यार्थ्यांना गेल्या दीड वर्षांपासून गुणपत्रिकाच मिळालेल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित सॉफ्टवेअर कंपनी व दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यावल-भुसावळ (जि.जळगाव) येथील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२५) * ८२९४८ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल-भुसावळ (जि.जळगाव) येथील रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येऊन रस्त्यावर साईड पट्टयाही नसून अनेक ठिकाणी खड्डे पडल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) तसेच, भुसावळ तालुक्यातील किन्ही, चोरवड, गोजोरे, कंडारी, उमाळे, रस्ता प्रजिमा- २६ कि.मी ११/०० ते १३/०० (वराडसीम ते गोजोरे) गावातील लांबी कॉंक्रिटीकरणासह गटारी व मजबुतीकरणाचे काम दिनांक १२ मार्च,२०२४ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक असतांनाही ते विहित वेळेत पूर्ण न केल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम निकृष्ट केल्याने करारातील अटी व शर्तीनुसार प्रती दिन रुपये २०००/- प्रमाणे दंड आकारण्यात येऊ शकतो असे उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भुसावळ यांनी त्यांच्या दिनांक २२ डिसेंबर, २०२३ च्या पत्रानुसार लेखी सूचना ठेकेदार वा श्री.तुषार महाजन यांना देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणांची शासनाने चौकशी करुन रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत तसेच संबंधित कंत्राटदार व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे,

यावल ते भुसावळ या रस्त्यावरील काम करारनाम्यातील तरतूदीनुसार करण्यात आले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूस अस्तित्वात असलेल्या डांबरी भागावरील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) सदर रस्त्याच्या कामाची भौतिक प्रगती न राखल्याने करारनाम्यातील तरतूदीनुसार संबंधित कंत्राटदारावर दिनांक १३/०३/२०२४ पासून प्रतीदिन रु.२०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागामधील**
**अधिकारी आणि कंत्राटदार यांनी गैरव्यवहार केल्याबाबत**

**(२६) * ८१६२९ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागामधील ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करुन हजारो कोट्यवधींची कामे मे डी.व्ही.पटेल अँड कंपनीला देण्यात आल्याचे दिनांक ७ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रक्रियेतील गैरव्यवहार कंत्राटदार व विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंत्राटदार कंपनी व दोषी अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
मे.डी.व्ही.पटेल अँड कंपनीला ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये सन २०२३-२४ मध्ये स्पर्धा करुन विभागनिहाय एकूण ६ कामे मिळालेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आरटीई अंतर्गत प्रवेश देणाऱ्या शाळांना थकीत अनुदानाची रक्कम अदा करणेबाबत**

**(२७) * ७९९९५ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी, विनाअनुदानित शाळांमध्ये आर्थिक दुर्बल घटकातील मुलांना आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी संस्था चालकांना शैक्षणिक शुल्क शासनामार्फत देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीची तब्बल २४०० कोटींची रक्कम सन २०१७ पासून थकीत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, थकीत अनुदानाची रक्कम न मिळाल्यामुळे राज्यातील काही शाळांनी आरटीई अंतर्गत प्रवेश देण्यास नकार दिल्यामुळे वंचित/गरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन थकीत अनुदानाची रक्कम तातडीने अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) परभणी जिल्ह्याने सन २०१२-१३ ते सन २०२३-२४ पर्यंत रु. ३१.६२ कोटी इतकी मागणी केली असून रु.११.५८

कोटी इतका निधी आरटीई खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी वितरीत करण्यात आला आहे.
(३), (४) व (५) हे अंशत: खरे आहे.

आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपूर्ती पात्र शाळांना अदा करण्यासाठी वित्त विभागाने ठरविलेल्या अटी व शर्तींनुसार प्राप्त होणारा निधी शिक्षण संचालनालयामार्फत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडून संबंधित शाळांना वितरीत करण्यात येतो. त्यानुसार, सन २०१२-१३ ते सन २०२२-२३ पर्यंत १०९३.३५ कोटी इतका निधी वितरीत झाला असून १८०३.१८ कोटी रक्कम प्रलंबित आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास महामंडळांतर्गत भात खरेदी केंद्रामध्ये तांदुळाचा झालेला गैरव्यवहार

**(२८) * ७९४४२ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित यांच्या जव्हार प्रादेशिक कार्यालयांतर्गत पालघर, ठाणे व रायगड जिल्ह्यामध्ये आधारभूत भात खरेदी योजनेअंतर्गत भात खरेदी केंद्रामध्ये जमा होणाऱ्या उच्च प्रतीच्या तांदुळाची परस्पर विक्री करून त्याच्या ऐवजी स्वस्त धान्य दुकानात उपलब्ध असलेला अथवा आंध्र प्रदेशमधून कमी किंमतीचा तांदुळ जमा करण्यात येत असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भात खरेदी केंद्रावर देखरेख ठेवण्यासाठी कोणतीही शासकीय यंत्रणा कार्यरत नसून भाताची भरडाई करणारे मिल मालक व शासकीय अधिकारी यांच्या संगनमताने हे प्रकार घडत असून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रामध्ये दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४ रोजी याबाबत बातमी प्रसिद्ध झाली होती. तथापि, पालघर, ठाणे व रायगड जिल्ह्यामध्ये अशाप्रकारची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) हे खरे नाही.

धान खरेदी प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी आदिवासी क्षेत्राकरिता आदिवासी विकास महामंडळ, नाशिक व उर्वरित क्षेत्रासाठी पणन महासंघ, मुंबई या यंत्रणा कार्यरत असून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकियेचे नवीन नियम रद्द करण्याबाबत

**(२९) * ७९५१९ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री**

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाने शिक्षण हक्क कायद्यांतर्गत दिनांक ९ फेब्रुवारी, २०२४ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार, १ ते ३ किलोमीटर परिसरात शासकीय किंवा अनुदानित शाळा असल्यास खाजगी किंवा विनाअनुदानित शाळेत प्रवेश हवा असल्यास त्यांना स्वतंत्रपणे शाळेची निवड करुन थेट फी भरुन प्रवेश घ्यावा असे सूचित करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्या नियमानुसार विद्यार्थी वास्तव्यास असलेल्या एक ते तीन किमी परिसरातील शासकीय किंवा अनुदानित शाळांमध्येच प्राधान्याने प्रवेश घ्यावा लागणार असून ती प्रवेशप्रक्रिया झाल्यानंतरच खाजगी शाळांमधून प्रवेश प्रकिया सुरु करण्यात येणार असून “आरटीई” संकेतस्थळावर अर्ज भरताना खाजगी शाळांचे पर्यायच उपलब्ध करुन देण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरटीई प्रवेश पोर्टलवर नोंदणी केलेल्या पालकांनी प्रवेश प्रक्रिया करुनही अनेक विनाअनुदानित शाळांनी आरटीई प्रवेशासाठी साइनअप केलेले नसल्यामुळे त्या शाळा पोर्टलवर उपलब्ध नसल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आरटीई कायदयातील बदलास विद्यार्थी व पालकांनी प्रचंड विरोध केलेला असून त्यासंदर्भात शासनाने प्रसिध्द केलेली अधिसूचना रद्द करुन, प्रवेश प्रक्रिया पूर्वीप्रमाणेच राबविण्यात यावी अशी मागणी विद्यार्थी, पालक व त्याचबरोबर शिक्षण संस्था/संघटनांनी शासनाकडे दिनांक ३० जून, २०२४ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१), (२), (३), (४) व (५) होय, हे खरे आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क, (सुधारित-२) नियम, २०२४ या दि.०९.०२.२०२४ रोजीच्या अधिसूचनेविरुद्ध मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ मुंबई येथे याचिका क्र. १४८८७/२०२४, जनहित याचिका क्र.१५५२०/२०२४ व इतर संलग्न याचिका दाखल झाल्या आहेत. जनहित याचिका क्र.१४८८७/२०२४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.०६.०५.२०२४ रोजीच्या सुनावणीत आरटीई बाबतच्या दि.०९.०२.२०२४ रोजीच्या अधिसूचनेस स्थगिती दिली आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने, सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाची आरटीई प्रवेश प्रक्रिया पूर्वीप्रमाणे राबविण्यात आली आहे. सन २०२४-२५ या वर्षात आरटीई अंतर्गत ९२१७ स्वयंअर्थसहायित शाळांनी नोंदणी केली आहे. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी-वाडा (जि.ठाणे) महामार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३०) * ७९५०३ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील भिवंडी-वाडा महामार्गाचे काम कोटयवधी रुपये खर्च करुनही निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे सदर महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून अपघातांच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या महामार्गाच्या निकृष्ट कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु असलेली चौकशी पूर्ण

झाली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत तसेच संबंधित कंत्राटदार व दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) रस्त्याचे कामाबाबत तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचे मार्फत चौकशी आदेशित करण्यात आली असून सदर प्रकरणी अहवाल अद्याप अप्राप्त आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
सद्य:स्थितीत भिवंडी ते वाडा रस्ता व वाडा ते मनोर रस्ता संपूर्णपणे दुरुस्त करण्यात आलेला असून सद्य:स्थितीत दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे काम सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शक्तीपीठ महामार्गास विरोध असतांनाही शेतकऱ्यांकडून जमिनी संपादित करण्यात येत असल्याबाबत**

**(३१) * ७९९२९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शक्तीपीठ महामार्गासाठी एकूण २७००० एकर जमीन संपादित करण्यात येत असून यात शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात जमिनी संपादित करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गाच्या भूसंपादनासंदर्भात कोल्हापूर येथील शेतकरी मेळाव्यात गोवा ते नागपूर शक्तीपीठ महामार्गासाठी १२ जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या भूसंपादनास प्रचंड विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात नागपूर ते रत्नागिरी समांतर महामार्ग तसेच पश्चिम महाराष्ट्रातून कोकणात जाण्यासाठी १२ राज्यमार्ग असतांनाही अशाप्रकारे रस्त्यांसाठी मोठ्या प्रमाणात भूसंपादन करताना राज्यातील रस्ते निर्मितीमध्ये पारदर्शकता राहिली नसल्याने यापूर्वीचे रस्ते व प्रस्तावित रस्ते याबाबत श्वेतपत्रिका काढण्याबाबतचा ठराव करुन शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) शक्तीपीठ महामार्गासाठी एकूण १२ जिल्ह्यांमधील साधारणतः ९३८५.३६ हेक्टर (२३१८२ एकर) जमीन संपादित करावी लागणार आहे.
(२) होय, अंशतः खरे आहे.
शक्तीपीठ महामार्गास विरोध दर्शविणारी कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील स्थानिकांचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) हे खरे नाही.
प्राप्त निवेदनांमध्ये श्वेतपत्रिका काढण्याबाबतच्या ठरावाचा उल्लेख आढळला नाही.
(४) शेतकऱ्यांच्या निवेदनांबाबत सर्वंकष विचार करुन, तसेच प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकरी / भूधारक यांना विश्वासात घेण्यात येईल. त्यानंतरच सदर प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी शेतकऱ्यांचे / भूधारकांचे नुकसान होणार नाही, या दृष्टीने शासन पुढील योग्य तो निर्णय घेईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील गोरेगाव (पूर्व) संतोष नगर परिसरात चिकन शोरमा खाल्ल्याने इसमाचा झालेला मृत्यू

**(३२) * ८१८१८ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील गोरेगाव (पूर्व) संतोष नगर परिसरात रस्त्यावर विक्री होणारा चिकन शोरमा खाल्ल्याने १५ जणांना विषबाधा झाली असून यापैकी श्री.प्रथमेश भोकसे यांचा दिनांक ०६ मे,२०२४ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणतेही अधिकृत प्रशिक्षण नसताना मुंबईतील रस्त्यांवर कमी प्रतीच्या व अशुध्द मांसापासून अशाप्रकारे पदार्थ बनवून त्यांची सर्रास विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारच्या खाद्यपदार्थ विक्रींवर संबंधित विभागाचे कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे अशा घटनांमध्ये दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशाप्रकारच्या खाद्यपदार्थ विक्रींवर आळा आणण्याबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) हे अंशत: खरे आहे.

गोरेगाव, पूर्व (मुंबई) येथील एकूण १२ जणांना शोरमा खाल्ल्यामुळे विषबाधा झाली आहे. तथापि, श्री. प्रथमेश विनोद भोकशे या व्यक्तीने मानखुर्द, मुंबई येथे शोरमा खाल्याने विषबाधा झाली होती. सदर व्यक्तीचा दि. ०७.०५.२०२४ रोजी मृत्यू झाला आहे. परंतु, शवविच्छेदन अहवाल प्राप्त नसल्यामुळे मृत्युचे कारण स्पष्ट झाले नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासनाच्या बृहन्मुंबई कार्यालयाने सन २०२३-२४ मध्ये विशेष करुन मांसजन्य खाद्यपदार्थ विक्री करणारे अन्न व्यवसायिकांचे वेळोवेळी Fostac Training चे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. तसेच दिनांक ०५.१०.२०२३ व दि. ०९.१०.२०२३ रोजी एकूण ६९ चिकन व मटण विक्रेत्यांना प्रशिक्षण देण्यात आले होते.

अन्न पदार्थातील भेसळीला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यभरात उत्पादक, वितरक, किरकोळ विक्रेते रस्त्यावर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापना यांचे नियमित तपासण्या करून नमुने घेण्याची कार्यवाही निरंतर केली जाते. अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील तरतुदीचे उल्लंघन आढळून आल्यास कायद्यातील तरतुदीनुसार नियमानुसार योग्य ती उचित कार्यवाही करण्यात येते.

(४) मानखुर्द, मुंबई येथील एका इसमास दि. ०४.०५.२०२४ रोजी शोरमा खाल्यानंतर पोटदुखी व जुलाबाचा त्रास झाला होता. सदर व्यक्तीचा दि. ०७.०५.२०२४ रोजी परेल येथील के.ई.एम रुग्णालयात मृत्यू झाला आहे. परंतु, शवविच्छेदन अहवाल प्राप्त नसल्यामुळे मृत्युचे कारण स्पष्ट झालेले नाही. शोरमा विक्री करणा-या संबंधित जबाबदार व्यक्तीस संशयावरून ट्रॉम्बे पोलीस ठाणे हद्दीत महाराष्ट्र नगर, मानखुर्द, मुंबई येथे गु. र. क्र. २११/२०२४, दि. ०६.०५.२०२४ रोजी गुन्हा नोंद करून अटक करण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासनाने संबंधित जबाबदार व्यक्तीच्या राहत्या घरातून शोरमा बनवण्यासाठी लागणारे उपलब्ध असलेल्या कच्च्या मालाचे अनौपारिक नमुने घेवून विश्लेषणासाठी पाठविण्यात आले होते. सदर नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत.

तसेच, गोरेगांव (पूर्व) येथील संतोषनगर परिसरात रस्त्यावर विक्री करण्यात येणारा शोरमा खाल्यामुळे १२ जणांना विषबाधा झाली असल्यामुळे संबंधिताविरुध्द दिंडोशी पोलीस ठाणे येथे अदखलपात्र गु. नो. क्र. ११०१/२०२१, दि. २६.०४.२०२४ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात समग्र शिक्षा अभियानांतर्गत होत असलेला गैरव्यवहार

**(३३) * ८२३६४ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील सुमारे आठ लाख कामगार राज्यासह परराज्यात ऊस तोडणीसाठी जात असल्याने त्यांच्या मुलांसाठी समग्र शिक्षा अंतर्गत २२० हंगामी वसतिगृह शासनाच्या वतीने सुरू करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभियानाच्या अंमलबजावणी संदर्भात अवनी संस्थेने ११ साखर कारखान्यांना भेटी देऊन सुमारे दोन हजार कुटुंबाची तपासणी केल्यानंतर त्यातील सुमारे १८३९ मुले ऊस तोडणी कामगारांसोबत कोल्हापूरमध्ये असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांची हजेरी बीड जिल्ह्यातील शाळांच्या हजेरी पटावर दाखवत असल्याचे माहे मार्च, २०२४ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अवनी संस्थेने पाठविलेल्या यादीच्या अनुषंगाने बीड तालुक्यातील दोन व शहरातील एक अशा तीन शाळांना राजश्री छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान व जागर प्रतिष्ठान यांच्या प्रतिनिधींच्या तपासणी पथकाने तपासणी केल्यावर बनावट हजेरीपट निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रत्यक्षात ही मुले वसतिगृहात न राहता केवळ हजेरी पटावर दाखवून त्यांच्या नावाने मोठ्या प्रमाणात निधी घेवून गैरव्यवहार करण्यात येत असून त्यावर शिक्षण विभागाचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषी संस्था व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी समग्र शिक्षा अभियानांतर्गत बीड जिल्ह्यात एकूण १९७ हंगामी वसतिगृहे माहे ऑक्टोबर, २०२३ ते माहे मार्च, २०२४ या ऊसतोड हंगाम कालावधीत सुरु होती.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) विद्यार्थी हे कायम स्वरुपी स्थलांतरीत होत नसल्यामुळे त्यांचे नाव हजेरीपटावरुन कमी होत नाही.

(४) राजश्री छत्रपती शाहु महाराज प्रतिष्ठान व जागर प्रतिष्ठान यांच्या प्रतिनिधींच्या तपासणी पथकाने बीड शहरातील खाजगी माध्यमिक शाळा व बीड तालुक्यातील जि.प.कें.प्रा.शा, हिवरापहाडी व जि.प.प्रा.शा. पोखरी या दोन ठिकाणी भेट दिली. परंतु, यापैकी फक्त जि.प. कें.प्रा.शा, हिवरापहाडी या ठिकाणी हंगामी वसतिगृह होते. परंतु, अवनी संस्थेच्या तपासणीमध्ये आढळून आलेले विद्यार्थी हंगामी वसतिगृहाचे लाभार्थी नाहीत.

(५) सन २०२३-२४ मध्ये सुरु असलेल्या हंगामी वसतिगृहांची जिल्हास्तरावरील पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत दोन वेळा माहे डिसेंबर, २०२३ रोजी प्रथम तपासणी व माहे फेब्रुवारी, २०२४ रोजी द्वितीय तपासणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये आढळून आलेली विद्यार्थी संख्या व बायोमॅट्रीक उपस्थिती याचा ताळमेळ घेऊनच हंगामी वसतिगृहांना निधी वितरित करण्यात आला आहे.

अवनी संस्थेच्या तपासणीमध्ये आढळून आलेले विद्यार्थी हंगामी वसतिगृहाचे लाभार्थी नाहीत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चेंबूर ( मुंबई ) येथील स्वामी विवेकानंद हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या अनुदानित शाळेत मिड डे मिलमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३४) * ७९४७८ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर ( मुंबई ) येथील स्वामी विवेकानंद एज्युकेशन सोसायटी संचालित अनुदानित शाळेच्या सिंधी सोसायटी, कलेक्टर कॉलनी आणि ठक्कर बाप्पा कॉलनी या तीन ठिकाणी कोरोना काळात मिड डे मिल अंतर्गत २९ हजार किलोचा धान्य घोटाळा झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जून, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत धान्य खराब झाल्याने त्याची विल्हेवाट लावल्याबाबतचा पंचनामा शाळेच्या मुख्याध्यापिकेने सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पंचानाम्यामध्ये नुकसान झालेल्या अन्नधान्यांची विल्हेवाट लावलेल्या ठिकाणाचा तसेच वापरलेले वाहन तसेच चालकाचा तपशील नसल्यामुळे पंचनामा बोगस असल्याचे चौकशी अहवालात नमूद केल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १६ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल करण्यात येऊनही अद्यापही पोलीसांनी संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल केला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शाळेच्या मुख्याध्यापिकेवर कारवाई करण्याचा अहवाल मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे सादर करण्यात येऊनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

स्वामी विवेकानंद हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज सिंधी सोसायटी, चेंबूर या शाळेमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सन २०२०-२१ मध्ये तत्कालिन पुरवठेदारामार्फत शाळास्तरावर ६,४०० कि.ग्रॅ. मसूरडाळ व ६,४०० कि.ग्रॅ. हरभरा इतका धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात आला होता.

सदर धान्यादी मालापैकी ३,४८१ कि.ग्रॅ. मसूर डाळ व ३,४८१ कि.ग्रॅ. हरभरा असा एकूण ६,९६२ कि.ग्रॅ. इतक्या धान्यादी मालाचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४), (५) व (६) होय, हे खरे आहे.

चेंबूर येथील स्वामी विवेकानंद हायस्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज सिंधी सोसायटी या शाळेत सदर योजनेबाबत झालेल्या अनियमिततेबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या कार्यालयामार्फत चार सदस्यांची चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीच्या अहवालामध्ये अनियमितता झाल्याचे अभिप्राय देण्यात आले आहेत.

चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित मुख्याध्यापक यांच्याविरुध्द गुन्हा नोंदवून कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग यांनी दि.२६ एप्रिल, २०२४ रोजीच्या पत्रान्वये वरिष्ठ पोलिस निरिक्षक, चुनाभट्टी पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे. सदर विषयाबाबत पोलिसामार्फत तपास सुरू आहे. तथापि, अद्यापर्यंत पोलिसांनी गुन्हा नोंदविलेला नाही.

-----------------

**पालघर येथील नंडोरे नोवेल इंडस्ट्रीजमधील बनावट जिऱ्याचा कारखाना बंद केल्याबाबत**

**(३५) * ७९९६८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर येथील नंडोरे नोवेल इंडस्ट्रीजमध्ये बनावट जिऱ्याचा कारखाना सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखान्यासंदर्भात नंडोरे देवखोप ग्रामपंचायतीच्या माजी सरपंचांनी तहसिलदार, जिल्हाधिकारी, पंचायत समिती व जिल्हा परिषद प्रशासनाकडे अनेक तक्रारी केल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक तक्रारी प्राप्त होऊन नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या या बोगस कारखान्यावर वेळेत कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक पाठपुराव्यांमुळे सदर कारखाना अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत दिनांक २९ जानेवारी, २०२४ रोजी वा त्या सुमारास बंद केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन बोगस कारखान्यावर कारवाई करण्यासह याकडे दुर्लक्ष व विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) अन्न व औषध प्रशासन, ठाणे या कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिकारी यांनी शांतीनगर पोलीस स्टेशन, भिवंडी येथे दाखल केलेला प्रथम खबरी अहवाल क्र.०२७६/२०२४, दि.२४.०१.२०२४ च्या अनुषंगाने पुढील तपासादरम्यान अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, पालघर कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिकारी यांनी दि.२५.०१.२०२४ रोजी सदर गुन्ह्यातील उत्पादक आस्थापना मे. जागृती एन्टरप्रायजेस, शॉप नं.१,२,३ शिवकृपा आर्केड, नोवेल इंडस्ट्रियल इस्टेट, नांदोरे, पालघर या आस्थापनेची तपासणी करुन १) Jeera (९ Kg Pack) २) Jeera (From ५० kg Bag) ३)Adulterant Powder (Black Coloured) ४) Adulterant Powder (White Coloured) ५) Adulterant Powder (Cream Coloured) ६) Adulterant Powder (Brown Coloured) असे एकूण ६ अन्नपदार्थाचे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेऊन उर्वरित एकूण २५५६ किलोचा रु.४,१३,९२०/- किंमतीचा साठा जप्त करून शांतीनगर पोलीस ठाणे, भिवंडी यांच्या ताब्यात देण्यात आला आहे. सदर आस्थापनेकडे अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत आवश्यक परवाना नसल्याने आस्थापनेस व्यवसायबंदचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.